# प्रेसनोट पोलीस अधीक्षक कार्यालय अमरावती ग्रामीण दिनांक 14 / 10 / 2023

| अ.क्र. | पो.स्टे.अप.क्र. कलम | फिर्यादीचे नाव | आरोपीचे नाव | घटनास्थळ | घटना.ता. वेळ | दाखल.ता. वेळ | हकिकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | तळेगाव 368/23 कलम 452,326 भादवी | नर्मदा मारोतरावं गावंडे वय -70 वर्ष राहणार तळेगाव दशासर | कैलास विठ्ठलराव वाघधरे वय 45 वर्ष रा. तळेगाव दशासर | ग्राम तळेगाव दशासर | 13/10/2023 चे 20.15वा. ते 20.30 वा दरम्यान | 13/10/2023 चे 23,18 वा | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील आरोपी व जखमी हे एकमेकांच्या घराशेजारी राहत असून त्यांच्यामध्ये शिल्लक कारणाने नेहमी वाद होत होता घता वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने जखमी याने त्याच्या मामी बहिणी सोबत केलेली हसी मजाक त्याला उद्देशून केली आहे असा गैरसमज निर्माण करून व मागील राग मनामध्ये धरून आरोपीच्या घरी जाऊन त्याला काठीने त्याच्या डोक्यावर मारून गंभीर जखमी केले जखमी याची वैद्यकीय तपासणी केली असता त्याला जास्त मार असल्यामुळे त्याला रेफर करण्यात आले तसेच वैद्यकीय मेडिकल सर्टिफिकेट वरून फिर्यादी यांच्या जवानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला |
| 2 | आसेगाव पूर्णा 265/23 क. 457,380 भादवी | योगेश बालकिसन जोशी, वय 33 वर्ष, धंदा - पुजारी रा,- राजना पूर्णा, | अज्ञात | राजना पूर्णा लक्ष्मी नारायण मंदिर उत्तर 12 किमी. | 12/10/23 चे 21.30 वा ते दी13/10/23 चे 05.30 वा दरम्यान | 13/10/2023 चे 17.21 वा . | हकीकत अशा प्रकारे की , नमुद घ. ता. वेली व ठिकानी फि मागिल तीन पिढया पासून नमूद मंदिरात देख रेख व पुजारी मन्हुन आपले कुटुबा सह राहत असुन नमूद घ.ता.वेली फि हे मंदिर बंद करून घरी गेले व दुसार्या दिवशी पहाटे मंदिरात येताच त्यांना मंदिरचे दार उघड़े दिसले आत जावूंन पहिले असता वर नमूद माल कोणी अज्ञात ने चोरुन नेला आशा फि.चे जबानी रिपोर्ट वरुन सदर चा गुन्हा दाखल करन्यात आला. |
| 3 | वरुड 650/23 कलम 379. भा द वी. | भगवंत रामचंद्र चोबीतकर वय 56 वर्ष , धंदा शेती ,रा. विजयनगर वरूड | अज्ञात | तहसील कार्यालय जवळ वरुड 02 किमी उत्तर | 11/10/23 चे 18/30 वा. | 13/10/23 चे 18/39 वा | हकीकत अशाप्रकारे आहे की , नमूद घ ता वेळी व ठिकाणी फिर्यादी हे दि 11/10/23 रोजी मोसा घेऊन बुधवार बाजाराला आले असता त्यांनी त्यांची गाडी तहसील कार्यालय जवळ हॅण्डल लॉक करून उभी केली सायंकाळी अंदाजे 06/30 दरम्यान फिर्यादी बाजार करून जिथे मोटरसायकल लावली तिथे आले असता त्यांना त्यांची मोसा दिसून आली नाही.मोसा चा आज पावतो शोध घेतला असता मिळून आली नाही कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली आहे.वरून सदर गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| 4 | मोर्शी 496/2023 कलम 279:337:33 8भा द वि | प्रवीण अरुणराव पाचघरे वय 49 वर्ष धदा मेडिकल दुकान राहणार चिखल सावंगी मोर्शी | काळ्या रंगाची स्प्लेंडर गाडीचा नंबर माहित नाही | चिखल सावंगी फाट्यापासून 100 मीटर | 24/7/2023 चे 14/00 ते 24/7/2023 चे 14/30 वा दरम्यान | 13/10/2023 चे 19/29वा | हकिकत अशा प्रकारे आहे की नमूद घ ता वेळी यातील दिनांक 24 /7/ 2023 रोजी दुपारी 2/00 वा सुमारास माझी मोटरसायकल क्रमांक MH 27 DK 8346 मी व माझा पार्टनर दीपक शेषराव तडस असे मेडिकल बंद करून मोर्शी येथे कामानिमित्त जात असता चिखल सावंगी फाट्यापासून 100 मीटर अंतरावर डांबरी रोडवर काळ्या रंगाची स्प्लेंडर गाडी तिचा नंबर माहित नाही ती गाडी भरडा वेगाने व निष्काळजीपणाने येऊन माझे गाडीला मागून ठोस मारून पळून गेले ठोस मारल्यानंतर मी व दीपक रोडवर खाली पडलो मला मुका मार लागला तसेच माझा पार्टनर दीपक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | तडस यास उजव्या बाजूने डोक्याला ठेसले व उजव्या पायाला पंजावर मार लागला रक्त निघाले म्हणून मी माझे ओळखीचे चेतन सिंगरवाडे यांना फोन करून घटलेली घटना सांगितली त्यांनी लगेच त्यांची फोर व्हीलर गाडी घेऊन घटनास्थळी आल्यावर आम्ही त्या गाडीत बसून हॉस्पिटल अमरावती येथे डॉक्टर निलेश केचे यांचे कडे भरती केले मला जास्त मारा असल्याने मी उपचार केला व आज रोजी उपचार करून पोस्टला येऊन जबानी रि वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला |
| 5 | मोर्शी 497/2023 कलम 224 भा द वि | पो का रमेश भदू सिंग चव्हाण | हौसाजी भाऊराव जगदंबे शिक्षा बंदी क्रमांक सी 740 राहणार कारेगाव धर्मवाद नांदेड महाराष्ट्र | खुले कारागृह मोर्शी यांचे शेता | 13/10/2023 चे 11/00 ते 23/10/2023 चे 15/00 वा दरम्यान | 13/10/2023 चे 20/23वा | हकिकत अशा प्रकारे आहे की नमूद घ ता वेळी यातील दिनांक 13 /10/ 2023 रोजी सकाळी नियमितपणे शेती अंमलदार श्री रमेश भादू सिंग चव्हाण यांनी सकाळी 8/35 वा कामासाठी 12 बंदयांना शेती कामकाजासाठी कारागृह बाहेर घेऊन गेले होते कारोगृहाची शेती ही अप्पर वर्धा धरणाचे उजव्या कालव्याच्या तूर्तफा असल्याने काही बंदी कालव्याचा उजव्या बाजूने व काही बंदी डाव्या बाजूने काम करीत त्यानंतर दुपारी 11/00 वाजता सुमारा सर्व बंध यांना जेवण्याकरिता एकत्र बोलविणे असता शिक्षा बंदी क्रमांक सी 740 हौसाजी रामभाऊ जगदंबे हा जेवणाकरिता उपस्थित नसल्याचे शेती अमलदार श्री रमेश भादोसिंग चव्हाण यांचे निदर्शनात आले तेव्हा त्यांनी इतर बंधनात सदरचा बंद्यास जेवण्याकरिता बोलवा असे सांगितले तेव्हा सदर बंदी कारागृह शेतीमध्ये बंद यांना आढळून आला नाही तेव्हा शेती अंमलदार श्री रमेश चव्हाण यांनी सदर बंदी आढळून येत नसल्याची माहिती वरिष्ठांना दिली तेव्हा वर्षांच्या आदेशानुसार कारागृह कर्मचारी यांनी सदर बंदीची दुपारी 3/00 वाजेपर्यंत कारागृह परिसरात शेती पार्टी गाव नाशिकपूर गाव पिंपळखुटा गाव मोर्शी बस स्टॅंच नाव चिंबोरा गाव इत्यादी ठिकाणी शोध घेतला असता सदर बंदी आढळून आलेले नाही सदर बंदी हा कारागृह शेतीमधून पडून गेला आहे तरी सदर चा गुन्हा दाखल करणे कामी,पोस्टे मोर्शी इथे गुन्हा दाखल करून दाखल करून तपासत घेतला आहे |
| 6 | मोर्शी 498/023 कलम 324.504.5 06 भा द वि | सौ वय 26 वर्ष रा मोर्शी | मनोज संजय राव भुसाटे राहणार गिट्टी खदान मोर्शी | अप्पर वर्धा कॉलनी पाण्या टाकीजवळ | 12/10/2023 चे 16/00 ते 12/10/2023 चे 16/00 वा दरम्यान | 13/10/2023 चे 23/06वा | हकिकत अशा प्रकारे आहे की नमूद घ ता वेळी यातील दिनांक 12 /10/ 2023 रोजी दुपारी 4/00 वा फिर्यादीचा वडील पायदळ रोड ने जात असतात त्या दरम्यान सावत्र आईचे जावई मनोज संजयराव भुसाळे व 32 वर्षे यांनी रोडने बरोबर चाल असे म्हणून माझे वडिलांची वाद-विवाद करून भांडण केले व डोक्याचे मागील बाजूला तसेच दोन्ही हाताचे दंडावर काठी मारून जखमी केले आपण उपट केल्याने दोन्ही हातावर डोक्याला खरकटले आहे व शिवीगाळ करून जीवा मारण्याची धमकी दिली म्हणून मी आज पोलीस स्टेशनला येऊन जबानी री वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपास घेतला |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | धारणी . 610/23 क. 324,504,506.भादवी. | सौ<br>वय -40 वर्ष, ,धंदा -मजूरी रा. नांदुरी ता.धारणी.जि. अमरावती | श्याम सुखाराम धिकारी रा.नांदुरी ता.धारणी.जि. अमरावती | नांदुरी शेत शिवार ता.धारणी. | 13/10/23 चे. 15/ 00 ते 15/30 वा दरम्यान. | 13/10/2023 चे. 20/08 वा. | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हीने तिचे आई कडील मिळालेल्या शेतात हजर होती. तेव्हा यातील नमूद घेतवेळी व ठिकाणी यातील नमूद आरोपी हा तेथे आला व फिला म्हणाला की, तु माझ्या शेताच्या हद्दीत कश्याला मक्याची पेंडी कापून ठेवली असे म्हणून फिला शिवीगाळ करून त्याचे हातातील विळा फी चे उजव्या हाताच्या अंगठ्या ला मारून जखमी केले व जीवे मारण्याची धमकी दिली अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून व मेडीसाठी वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |

पोलीस अधीक्षक कार्यालय अमरावती ग्रामीण
करीता